सकाळ

TODAY सातारा

सकाळ
सातारा, गुरुवार
१५ डिसेंबर २०१६
४

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगांव

# व्यायाम, खेळांमुळे माणूस आयुष्यभर तरुण

## हिंदकेसरी दीनानाथ सिंह; कोरेगावात आंतरविभागीय कुस्ती स्पर्धेचे उद्‌घाटन

सातारा, ता. १४ : कुस्ती हा खेळ शरीराबरोबर मनाची मशागत करणारा खेळ आहे. व्यायाम आणि खेळामुळे माणूस आयुष्यभर तरुण राहतो. विद्यार्थ्यांनी सतत खेळाची आवड जोपासून देशाचे नाव उज्ज्वल करावे, असे आवाहन हिंदकेसरी दीनानाथ सिंह यांनी व्यक्त केले.

कोरेगाव येथील डी. पी. भोसले कॉलेजमध्ये आयोजित शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय कुस्ती स्पर्धेचे उद्‌घाटन हिंदकेसरी दीनानाथ सिंह यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमास रयत शिक्षण संस्थेचे सहसचिव प्राचार्य डॉ. दिनानाथ पाटील, प्राचार्य विजयसिंह सावंत, प्राध्यापक, विविध महाविद्यालयांचे कुस्तीपटू विद्यार्थी, कुस्तीप्रेमी उपस्थित होते. दीनानाथ सिंह म्हणाले, "बनारस ही माझी जन्मभूमी, तर कोल्हापूर ही माझी कर्मभूमी आहे. महाराष्ट्राने मला प्रचंड मानसन्मान, माया, कर्तृत्व दाखविण्याची संधी दिली. कुस्ती आणि इतर खेळांमुळे माणूस आयुष्यभर तरुण राहतो.''

सहसचिव प्राचार्य डॉ. पाटील म्हणाले, "सांगली, कोल्हापूर आणि साताऱ्याने कुस्तीची परंपरा टिकविली आहे. रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील हेही कुस्तीचे शौकिन होते. डी. पी. भोसले यांनीही कुस्तीसाठी कुस्तीगीरांना मोठी मदत केली होती. ही भारतीय कुस्ती प्रगतिपथावर नेण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत.'' प्राचार्य डॉ. सावंत यांनी महाविद्यालय आणि कुस्ती स्पर्धेची माहिती दिली. यावेळी कॉमनवेल्थ स्पर्धेतील कुस्तीपटू रेश्मा माने, राष्ट्रीय कुस्तीपटू आकाश माने, ॲथलेटिक्स शुभम देशमुख, प्रा. सादू कोळेकर, प्रकाश जगदाळे यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास प्रा. के. आर. गावडे, प्रा. दिलीप पवार, प्रा. बाजीराव पाटील, ज्ञानदेव भोसले, बलभीम भोसले, विविध महाविद्यालयांचे कुस्तीपटू, प्राध्यापक उपस्थित होते. प्रा. द. म. डांगे, डॉ. विद्या नावडकर यांनी सूत्रसंचालन केले. जिमखाना प्रमुख प्रा. बाळकृष्ण भोसले यांनी आभार मानले.



**कोरेगाव : डी. पी. भोसले कॉलेजमध्ये कुस्ती स्पर्धेच्या उद्‌घाटनप्रसंगी दीनानाथ सिंह, प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत, ज्ञानदेव भोसले, बलभीम भोसले, प्रा. बाळकृष्ण भोसले आदी.**